पुणे महानगरपालिका कर्मचाऱ्यांचे मुखपत्र

# कल्याणवार्ता

• वर्ष २ रे • अंक : १६ •जानेवारी, २००९ • पृष्ठे ४

इंटरनेट आवृत्ती - www.punecorporation.org

**कामगार कल्याण निधी वार्षिक सर्वसाधारण सभा गुरुवार दि.५/२/०९ सकाळी ११.३० वाजता डॉ. आंबेडकर भवन येथे. सर्वांनी सहभागी व्हावे.**

## क्रीडा स्पर्धांचे शानदार उद्घाटन

कामगार कल्याण निधीमार्फत दिनांक १२ ते १९ जानेवारी, २००९ या कालावधीत निधीच्या सभासदांसाठी विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. क्रिकेट,



व्हॉलिबॉल, कबड्डी, लांब उडी, १०० मि.धावणे, टेबल टेनिस, कॅरम, बुध्दिबळ, रांगोळी, संगित खुर्ची, थ्रो बॉल, कुस्ती, ५० मि.पोहणे, बॅडमिंटन, निबंध, स्लो सायकलिंग, दोरीउड्या.या स्पर्धांचे उद्घाटन सोमवार दि.१२/१/०९ रोजी सकाळी ९.३० वा. पं.नेहरु स्टेडियम येथे संपन्न झाले. या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून भारतीय कसोटी क्रिकेट संघात खेळलेले व भारतीय क्रिकेट निवड समितीचे अध्यक्षपद भूषविलेले मा. चंदू बोर्डे उपस्थित होते. याशिवाय मा. बाळासाहेब थोरवे, कार्यवाहक, दि क्लब ऑफ महाराष्ट्र, पुणे आणि मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त श्री. देवनीकर उपस्थित होते. इंडियन प्रिमियर लिगमध्ये मुंबई संघाचे प्रतिनिधीत्व केलेले श्री. योगेश ताकवले यांची या प्रसंगी विशेष उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस निधीचे सचिव व सल्लागार (कामगार) यांनी प्रमुख पाहुण्याचे पुष्पगुच्छ देवून स्वागत करुन कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकामध्ये निधीची स्थापना, निधीतून राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजना आणि क्रीडा स्पर्धांचे महत्व मा. जगताप यांनी विषद केले. कामगार कल्याण निधीमार्फत क्रीडा स्पर्धांचे आयोजन करुन निर्माण झालेल्या उगमापासून महासागर निश्चित तयार होईल, अशी आशा मा. जगताप यांनी व्यक्त केली.

यानंतर कार्यक्रमामध्ये मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त श्री. देवनीकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. आपल्या मार्गदर्शनामध्ये महापालिका कर्मचाऱ्यांना विविध प्रशिक्षणाच्या योजना या निधीतून राबविण्यात येतात, त्याचाच एक भाग म्हणून मा.रामदेवजी बाबा यांचे उपस्थितीत जनजागरण शिबीरही आयोजित करण्यात आले होते. तसेच, क्रीडा स्पर्धांमधील महिलांचा सहभाग वाढविणेसाठी या वर्षीपासून महिलांसाठी विशेष क्रीडा प्रकारांचे आयोजन करण्यात आलेले आहे. तसेच, खेळामुळे कर्मचाऱ्यांची गुणवत्ता वाढीस लावण्यास निश्चितच मदत होते, कारण ज्यावेळी शरीर, मन आणि बुध्दी एकत्र येतात त्या वेळी अध्यात्माचा अनुभव आल्याशिवाय रहात नाही. हा स्वामी विवेकानंदांचा प्रसंगोचित संदेश देवून, मा. देवनीकर यांनी उपस्थित क्रीडापटुंना शुभेच्छा दिल्या.

मा. चंदु बोर्डे यांनी आपल्या भाषणामध्ये पुणे मनपातर्फे राबविण्यात येणाऱ्या प्रोत्साहनपर आणि स्तुत्य उपक्रमाचे कौतुक केले. खेळामुळे परस्परांमधील, अधिकारी/सेवकांमधील अंतर कमी होवून परस्परांमध्ये सहकार्याची भावना वाढीस लागते. तसेच, जयपराजयाचा विचार न करता खेळाचा पुरेपुर आनंद घ्या, असा मार्गदर्शनपर संदेश दिला. क्रिकेट खेळामध्ये क्रीडापटुंनी शुन्यावर बाद होणे, झेल सुटणे, धावबाद होणे, इत्यादी बाबींमुळे निराश होवू नये. त्याऐवजी चांगली गोलंदाजी करुन फलंदाजास बाद करणे, चांगले क्षेत्ररक्षण करणे, या बाबींच्या अनुषंगाने खेळाचा आनंद लुटण्याची सवय लावून घेणे आवश्यक आहे. तसेच, खेळामुळे कर्मचाऱ्यांची मनोनिग्रहता वाढून त्यांच्यामधील गुणवत्तेला निश्चितच न्याय मिळेल, अशी खात्री मा. बोर्डे यांनी व्यक्त केली. या कार्यक्रमास कामगार संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मा.दौंडकर, कामगार कल्याणाधिकारी यांनी केले.शेवटी मान्यवरांच्या हस्ते नाणेफेक होवून मुख्य भवन आणि अग्निशामक दल यांच्यातील सामन्यास शुभारंभ होवून कार्यक्रम संपन्न झाला.

## डॉ. आनंद यादव यांचे सफाई कर्मचाऱ्यांकडून अभिष्ट चिंतन

धनकवडी येथील रहिवासी व ग्रामीण संस्कृतीचे कलात्मक पध्दतीने दर्शन घडविणारे तसेच दैनंदिन मनपा सफाई कर्मचाऱ्यांच्या समस्यांबाबत संपर्कात असणारे मान्यवर लेखक डॉ. आनंद यादव यांची साहित्य संमेलन अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांच्या बंगल्याच्या आवारात रांगोळ्या काढून धनकवडी क्षेत्रीय कार्यालयातील सफाई सेवकांतर्फे डॉ. यादव यांना शॉल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व तिळगुळ देवून अभिष्टचिंतन प्रभाग समिती अध्यक्ष मा.फरांदे, सदस्य मा.तांबे व धनकवडे, क्षेत्रीय अधिकारी मा.माळी व वैद्यकीय अधिकारी डॉ केतकी घाटगे यांच्या उपस्थितीत करण्यात आले.



कार्यक्रमाचे आयोजन आरोग्य निरीक्षक घोलप, काथवटे, लाखे व मंडुपकर यांनी केले.

## रांगोळी स्पर्धेचे मा. महापौर यांच्या हस्ते उद्घाटन

दि.१६/१/०९ रोजी मनपा भवन येथे ११ सहभागी महिलांसाठी रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेचे उद्घाटन मा महापौर यांचे शुभ हस्ते झाले. या प्रसंगी मा.सुधाकर खाजगीवाले, जेष्ठ मुर्तीकार, मा.एम.एस.देवनीकर, त्यामध्ये रांगोळीने रंग भरणे या निकषान्वये परिक्षण करुन दिलेल्या निकालानुसार श्रीमती शुभांगी पारटे प्रथम श्रीमती राजश्री चपटे द्वितीय तर श्रीमती पूनम दिघे यांना तृतीय क्रमांक मिळाला. श्रीमती अरुणा जाधव व



अति.महा.आयुक्त (ज) व मा.उमाकांत दांगट, अति.महा.आयुक्त (वि) हे उपस्थित होते. स्पर्धेचे परिक्षण प्रा.घाटगे, मा.शाम भुतकर व प्रा.उडुपी यांनी केले. रांगोळी ही अतिप्राचीन कला असून ठिपक्यांची चित्रकृती तयार करुन श्रीमती गिता आचार्य यांना उत्तेजनार्थ पारितोषिके प्राप्त झाली. स्पर्धकांनी विविध छटांद्वारे रेखाटलेल्या कलाकृतींचे मा. महापौर व सर्व उपस्थितांनी कौतुक केले.

## कबड्डी स्पर्धेत अग्निशामक दल विजेते

दि.१७/१/०९ रोजी पं. नेहरु स्टेडियम येथे कबड्डी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेचे उद्घाटन मा. अशोक हरणावळ, सदस्य, पुणे मनपा व मा.रमेश शेलार, विशेष कार्याधिकारी, अतिक्रमण यांच्या हस्ते झाले. स्पर्धेत ३ संघांनी भाग घेतला. सामने साखळी पध्दतीने झाले. अंतिम अटीतटीच्या सामन्यात अग्निशामक दलाने विजेते तर सुरक्षा विभागाने उपविजेतेपद मिळविले.

## व्हॉलिबॉल स्पर्धा अग्निशामक दल येथे संपन्न



दि.१९/१/०९ रोजी अग्निशामक दल येथे व्हॉलिबॉल स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. स्पर्धेच्या उद्घाटनासाठी आलेल्या राष्ट्रीय खेळाडू भगवान परदेशी, विजय मांजरे, भाउ मोरे, अध्यक्ष, पुणे जिल्हा असोसिएशन या प्रमुख पाहण्यांचे सुरुवातीस निधीचे सचिव यांनी पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. प्रास्ताविकात जगताप यांनी व्हॉलिबॉल स्पर्धेसाठी अग्निशामक दलाने अत्यंत कमी वेळेत उपलब्ध करुन दिलेल्या उत्कृष्ट सोयीबद्दल आभार प्रकट केले व सर्वांना शुभेच्छा दिल्या. स्पर्धेची सुरुवात श्री परदेशी यांच्या हस्ते नारळ फोडून झाली. पाच संघांत साखळी पध्दतीने व्हॉलिबॉलचे सामने झाले. अधिक विजय प्राप्त केलेले अग्निशामक "क" व "ब" संघ अनुक्रमे विजेता व उपविजेता ठरला.

## प्रशासकीय सुधारणा

लोकशाहीमध्ये शासन व प्रशासन या दोन शाखा असतात. शासनातर्फे विकास उद्दिष्टे निश्चित करुन पूर्तीसाठी धोरणे ठरविण्यात येतात. विहित उद्दिष्टपूर्ती मान्य धोरणानुसार करण्याची जबाबदारी प्रशासकीय यंत्रणेची असते. भारतीय राज्यघटनेने कल्याणकारी लोकराज्य ही संकल्पना मुलभूत ठेवून, उद्दिष्टे व पूरक धोरणे मान्य केली. त्यानुसार प्रशासकीय यंत्रणा उभी करण्यात आली. ही यंत्रणा सुमारे ६० वर्षांपासून अस्तित्वात आहे. या यंत्रणेवर स्वातंत्र्यपूर्व काळातील घटक व विचारसरणीचा जबरदस्त पगडा राहिला आहे. कालानुरुप लोककल्याणाच्या कल्पना व गरजा बदलत गेल्या. त्यानुसार प्रासंगिक अनुभव, होणारे बदल, उपलब्ध वित्तीय स्त्रोत यांचा विचार करुन प्रशासकीय यंत्रणेमध्ये सुधारणा कालानुरुप कराव्या लागल्या, ही वस्तुस्थिती आहे. २१ व्या शतकातील प्रथम दशकपूर्तीला आपण माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात उत्तुंग भरारी घेतलेली आहे. नजिकच्या भविष्यकाळात विना कागद कार्यालय (Paperless office) ही संकल्पना नव्याने पूर्णत्वाला जाईल, असे दिसून येत आहे. जागतिक स्तरावर माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात भारत एक प्रबळ प्रगत दावेदार म्हणून पुढे येत आहे.

प्रशासकीय यंत्रणेची कार्यक्षमता वाढविण्यासाठी रचना, कार्यपध्दती व विचारसरणी सुधारणा करणे नितांत गरजेचे आहे. स्थानिक पातळीवर देण्यात येणाऱ्या नागरी सुविधा उच्च दर्जाच्या व वेळेवर दिल्यास नागरिकांच्या प्रतिक्रिया उत्तम रहाणार. कारण स्थानिक स्वराज्य संस्था या नागरिकांना दैनंदिन नागरी सुविधा देणारी सेवा संस्था आहे. ही विचारसरणी रुजल्यास नागरी सुविधा देताना उपलब्ध साधनसामग्री, मनुष्यबळ व वित्तीय स्त्रोत या सर्वांचा एकत्रित विचार करुन, प्रत्येक प्रसंगी सेवक/अधिकारी परिस्थितीनुसार अडचणींमधून मार्ग काढत असतात. स्थानिक स्वराज्य संस्थांनी लोकसहभाग ही कल्पना स्विकृत करुन, अंमलबजावणी करण्यास सुरुवात केली आहे. तसेच माहिती अधिकार अधिनियम यांचा एकत्रित परिपाक म्हणून प्रशासनातील कार्यपध्दती पूरक, अधिक लोकाभिमूख व पारदर्शक होत आहे. परिणामी प्रचलित मुलभूत यंत्रणा, तिची कार्यपध्दती आणि विचारसरणी यामध्ये कालानुरुप सुधारणा व बदल होत असतात. प्रशासन कार्याचे सतत परीक्षण व पर्यवेक्षण करण्यासाठी संघटना व कार्यपध्दती (Organisation and methods) यासाठी उपयुक्त कार्यप्रणाली देणे आवश्यक आहे. मुलभूत यंत्रणेमध्ये बदल होताना कालबाह्य प्रचलित रचना, विचारप्रणाली व कार्यपध्दती निष्प्रभ व निरुपयोगी ठरते. तसेच जनमानसाचा कौल घेवून काळाबरोबर चालताना या सर्वांमध्ये बदल करणे अत्यंत नैसर्गिक व नितांत गरजेचे ठरते. त्यासाठी यंत्रणेची रचना, मुलभूत विचारसरणी व कार्यपध्दती यांचे एकत्रित विश्लेषण करुन, अभ्यासपूर्ण मार्गदर्शक तत्वे किंवा निकष विहित करणेकामी संशोधन व विकास विभाग (Research & Development) असा स्वतंत्र विभाग कार्यरत ठेवणे अनिवार्य आहे. सर्वसाधारणपणे प्रशासकीय यंत्रणेमध्ये विचारसरणी व कार्यपध्दती याचे मुख्य काम म्हणजे अंमलबजावणी ही विहित अधिनियम, नियम, तंत्रप्रणाली, निकष, उपलब्ध साधनसामग्री व अन्य घटकांची उपलब्धता, त्याचबरोबर परिणाम करणारे घटक यांचा यथास्थित अभ्यास करणे, उपलब्ध मनुष्यबळातून कुशल मनुष्यबळ निर्माण करणे त्याचबरोबर उपलब्ध साधनसामग्री आणि मनुष्यबळाचा एकत्रितपणे पर्याप्त कार्यक्षमतेपर्यंत उपयोग करुन स्विकृत उद्दिष्ट वेळेत पूर्ती करणे हे खरे कौशल्याचे काम असते. त्यासाठी प्रशासकीय यंत्रणा अत्यंत लवचिक व नवीन बदलांना नैसर्गिकरित्या सामोरी जाणारी असावी. यामध्ये मुलभूत यंत्रणा व विचारसरणी याचा फार मोठ्या प्रभाव असतो. प्रचलित यंत्रणेमध्ये प्रचंड प्रमाणात कार्यक्षमता आहे. तथापि, ती अद्ययावत करुन, तिचे रुपांतर नागरिकांना सेवा देण्यामध्ये करणे हे अत्यंत कौशल्याचे आहे. परिणामी अशा कौशल्याच्या वापरामुळे श्रम, अर्थ, वेळ याची बचत तर होतेच तथापि, हे सर्व घटक सत्कारणी लागल्याने संबंधित करदात्यांना त्यांनी कररुपाने दिलेल्या पैशाचा पुरेपुर किंबहुना त्यापेक्षा जास्त मोबदला व समाधान देणे शक्य होते.

नवीन संकल्पनेमध्ये प्रशासकीय सुधारणा करताना प्रचलित यंत्रणेतील दोष शोधणे, कालानुरुप सुलभ बदल करणे व सुसंगत असा त्याचा उपयोग करणे, यंत्रणेतील मनुष्यबळास प्रोत्साहित करुन कार्यक्षमता वाढवून, त्याचे रुपांतर प्रत्यक्ष उद्दिष्टपूर्तीमध्ये करणे शक्य आहे. सन १९५४ मध्ये संघटना व पध्दती हा विभाग मा.पंतप्रधान यांच्या नियंत्रणाखाली स्थापन करण्यात आला. सध्या सेवक व प्रशासकीय सुधारणा म्हणून स्वतंत्रपणे हा विभाग कार्यरत आहे. या विभागाचे उद्दिष्ट व कार्य दप्तर दिरंगाई, कार्यपध्दतीतील दोष, अनुत्पादक खर्च कमी करणे, मनुष्यबळाची संरचना, तिचे स्वरुप व उद्दिष्ट स्पष्ट करणे, भरती व बढतीचे नियम व निकष निश्चित करणे, उपलब्ध मनुष्यबळाचा पर्याप्त क्षमतेपर्यंत वापर करणे, प्रशासनात सुलभता, गतिमानता व पारदर्शकता आणणे यासह अनुषंगिक सर्व बाबींचा अभ्यास करुन उपाय योजना सुचवून कार्यप्रणाली विकसित करणे ही कार्ये या विभागामार्फत पार पाडण्यात येतात. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सद्यस्थितीत याचा स्वतंत्रपणे विचार झाल्याचे दिसून येत नाही. तथापि, उद्दिष्टे, पार पाडावयाची जबाबदारी, मान्य धोरणे, उपलब्ध वेळ, मनुष्यबळ, अर्थ व साधनसामग्री याचा एकत्र सर्वांगीण विचार करुन, त्याचा पर्याप्त वापर करणे व उत्कृष्ट प्रकारे उद्दिष्टपूर्ती विहित वेळेत करणे ही काळाची गरज आहे. त्या अनुषंगाने संगणक युगामध्ये आमूलाग्र बदल करुन, विनाकागद प्रशासन ही संकल्पना स्विकृत करुन कार्यवाही करण्याचा व प्रशासकीय यंत्रणेमध्ये सुधारणा करण्याचा संकल्प करण्याची गरज आहे.

## परिचय अधिकारी/सेवकांचा

परिचय अधिकारी/सेवकाचा या सदरात या अंकात आपण पं.जवाहरलाल नेहरु स्टेडियमचे व्यवस्थापक शिवछत्रपती पुरस्कार विजेते श्री. सुभाष पुरी यांचा परिचय करुन घेणार आहोत.

ऑगस्ट, २००३ पासून व्यवस्थापक, पं. नेहरु स्टेडियम या पदावर कार्यरत असणारे श्री. पुरी सन १९८५ साली ज्यु. ग्रे.लेखनिक या पदावर मनपामध्ये रुजू झाले. त्यांना सन २००० मध्ये सिनि.ग्रे.लेखनिक या पदावर पदोन्नती मिळाली. क्रीडा विश्वातील त्यांच्या कामगिरीमुळे त्यांना व्यवस्थापक, पं. नेहरु स्टेडियम या पदावर विराजमान होण्याचा मान मिळाला.



श्री. पुरी यांचे बालपण एकत्र कुटुंबात एका मोठ्या चौसोपी वाड्यात जुन्नर येथे गेले. जुन्नरपासून जवळच असलेल्या प्रसिध्द ऐतिहासिक स्थळे शिवनेरी व लेण्याद्री येथे त्यांच्या क्रीडा क्षेत्रातील कारकिर्दीचा पाया रचला गेला. अगदी लहाणपणीच त्यांची नॅशनल टॅलेंट सर्च स्पोर्टस्मध्ये ॲथलेटिक्स या क्रीडा प्रकारासाठी निवड झाली. त्यांनी शालेय जीवनात महाराष्ट्र मंडळ येथे प्रसिध्द क्रीडातज्ञ श्री. शिवरामपंत दामले यांच्या देखरेखीखाली दोन महिन्यांचा निवासी सर्टिफिकेट कोर्स इन फिजिकल एज्युकेशन पूर्ण केला. त्यांनी विविध क्रीडा प्रकारांत आंतरशालेय स्पर्धांमध्ये भाग घेतला आहे. बारावीत असताना त्यांना रेल्वे स्टेशनमध्ये दु:खद अपघात झाला व त्यामध्ये त्यांना त्यांचा डावा हात कायमचा गमवावा लागला. अपघाताने खचून न जाता अपंगांच्या विविध राष्ट्रीय स्पर्धांमध्ये ४५ हून अधिक पदके मिळविली आहेत. सन १९९२ मध्ये कोलकाता येथे झालेल्या ऑलंपिक निवड चाचणीमध्ये त्यांची भालाफेक या क्रीडा प्रकारासाठी निवड केली व त्यांना बार्सिलोना ऑलिंपिकमध्ये भारतीय चमूत स्थान मिळाले. बीजिंग येथे १९९४ मध्ये पार पडलेल्या फार इस्ट ॲण्ड साउथ पॅसिफिक गेम्समध्ये भारतीय संघाचे प्रतिनिधीत्व करण्याची संधी त्यांना मिळाली तर १९९८ मध्ये झालेल्या ऑकलंड येथील क्रीडा स्पर्धांमध्ये भारतातर्फे पाठविण्यात आलेल्या ८ जणांच्या चमूचे त्यांनी नेतृत्व केले व त्यामध्ये भालाफेक या प्रकारात रौप्य पदक तर गोळाफेकमध्ये कांस्य पदक पटकावले. पुणे येथे सन १९९४ रोजी झालेल्या तिसऱ्या राष्ट्रीय स्पर्धेमध्ये त्यांनी संपर्क अधिकारी यामध्ये महापालिकेतील विविध खाती व स्पर्धा संयोजन समिती यांचेशी समन्वय राखून स्पर्धेसाठी आवश्यक असणाऱ्या सुविधा उपलब्ध करण्यात संयोजनाचा नवीन मानांक प्रस्थापित केला आहे. तसेच त्यांच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धांमधील अनुभवाचा उपयोग करुन त्यांनी स्वागत समितीचे सदस्य म्हणूनही काम पाहिले.

**संवादक : अरुण खिलारी**
**कामगार कल्याणाधिकारी**

१९९४ मध्ये महाराष्ट्र शासनाने त्यांच्या ॲथलेटिक्स या क्रीडा प्रकारातील कामगिरी विचारात घेवून त्यांना शिवछत्रपती पुरस्काराने गौरविलेले आहे. पुणे शहराचा नावलौकिक व किर्तीत भर घातल्याबद्दल तत्कालीन महापौर ॲड चंद्रकांत छाजेड व मा. अलि सोमजी यांच्या हस्तेही त्यांचा यथोचित नागरी सत्कार केला आहे.

सन २००० मध्ये भारत, ऑस्ट्रेलिया व न्युझिलंड या तिन देशांदरम्यान खेळल्य गेलेल्या तिरंगी क्रिकेट स्पर्धेतील एक सामना पुणे येथे भरविण्यात आला होता. श्री. पुरी यांच्या अथक परिश्रमाने रक्कम रु. ५०.०० लाखाहून जास्त खर्च करुन पं. नेहरु स्टेडियमचे रुप पालटले. यामध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा उदा. वातानुकुलित ड्रेसिंग रुम, कन्सिल्ड वायरिंग, फर्निचर उपलब्ध करुन घेतले. याची नोंद घेवून प्रसिध्द क्रिकेटपटू मा. चंदु बोर्डे यांनी देशात तत्कालीन असलेल्या ६ उत्तम क्रिकेट खेळपट्ट्यांपैकी नेहरु स्टेडियममधील खेळपट्टी एक आहे, असे गौरवोद्गार काढून त्यांची पाठ थोपटली. त्यांनी वैद्य स्टेडियम येथेही आसनक्षमतावाढ व विविध विकासाची कामे करुन मुलभूत बदल केले आहेत. आंतरराष्ट्रीय दर्जाचे सणस ग्राउंड उभारणीमध्ये त्यांचा मोलाचा वाटा आहे. या ठिकाणी सन २००६ व २००७ साली एशियन ग्रँड प्रिक्स स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. सलग २००३ ते २००७ अखेर सहा वेळा पुणे इंटरनॅशनल मॅराथॉनचा शेवटचा बक्षिस समारंभ पं. नेहरु येथे संपन्न होत असतो. येथील सुविधांची अनेक आंतरराष्ट्रीय खेळाडूंनी मुक्त कंठाने प्रशंसा केली आहे. तसेच, पुणे फेस्टिव्हल अंतर्गत गणपतीची प्राणप्रतिष्ठा व इतर समारंभ पं. नेहरु स्टेडियम येथे श्री. पुरी यांच्या नेतृत्वाखाली निर्विघ्नपणे पार पडत आहेत. मध्यंतरी काही काळ बंद पडलेल्या महापौर चषक स्पर्धा सुरु करण्यामध्ये श्री. पुरी यांनी पुढाकार घेतला होता. त्यांतर्गत कबड्डी, शरीरसौष्ठव, खोखो, मोटोक्रॉस, कुस्ती, इत्यादी आंतरकचेरी खेळ स्पर्धा आयोजित करण्यात येतात. कामगार कल्याण निधीतर्फे घेण्यात येणाऱ्या क्रीडा स्पर्धांच्या यशस्वी आयोजनात श्री. पुरी यांचा सक्रीय व निरपेक्ष सहभाग अतिशय मोलाचा आहे. कामगार कल्याण निधी त्यांचा त्याबद्दल अत्यंत ऋणी आहे व राहील.

सध्या उपलब्ध असलेल्या सुविधांमध्ये सातत्याने वाढ व आधुनिकीकरण करणे यासाठी ते कायम प्रयत्नशील असतात. विशेषत: तलवारबाजीसारख्या वैशिष्ट्यपूर्ण खेळांच्या प्रचार व प्रसाराबाबत त्यांनी भावी योजना आखली आहे. २०१० साली साजरा करण्यात येणाऱ्या पुणे महापालिका हिरक महोत्सवांतर्गत आंतरमहापालिका स्पर्धांचे आयोजन करण्यात येत आहे. कामगार कल्याण निधीमार्फत प्रस्तावित केलेल्या कामगार कल्याण भवनामध्ये क्रीडा संकुल उभारण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. कमाल आंतरराष्ट्रीय स्पर्धा पुणे येथे आयोजित करण्याचा बहुमान पुणे मनपा व पुणे शहरास सातत्य राखून मिळावा यासाठी ते अविरत कार्यरत राहून प्रयत्न करीत असतात. त्यांच्या या अशा उत्स्फूर्त प्रयत्नांना परमेश्वर निश्चितच यश देईल, या शुभेच्छा त्यांना निधीतर्फे त्यांच्या भावी उज्वल यशासाठी.

## सेवापूर्ती समारंभ संपन्न

महापालिकेच्या सेवेतून माहे डिसेंबर, ०८ मध्ये सेवानिवृत्त होणाऱ्या वर्ग १ ते ४ मधील अधिकारी/कर्मचाऱ्यांसाठी सेवापूर्ती समारंभ दि.३१/१२/०८ रोजी कॅ. वडके



हॉल येथे संपन्न झाला. डिसेंबर, ०८ मध्ये २० वयोपरत्वे तर ६ ऐच्छिक असे एकूण २६ सेवक निवृत्त झाले.

या समारंभासाठी अध्यक्ष म्हणून मा.श्री. विजय दहिभाते, उपायुक्त पुणे मनपा हे उपस्थित होते. तर मा. श्री शरद समेळ, नगर सचिव, श्री. तुकाराम जगताप, अध्यक्ष, पुणे म्युनिसिपल एम्प्लॉईज युनियन, मा. श्री. वसंतराव गोडबोले, अध्यक्ष, पुणे मनपा सेवानिवृत्त संघ हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस मा. नंदकिशोर जगताप, सल्लागार (कामगार) यांनी प्रास्ताविकपर भाषणात सेवानिवृत्त होणाऱ्या सेवकांकडे मागणी करताना सेवक महापालिकेच्या सेवेतून सेवानिवृत्त होत असले तरी त्यांनी मनपाने स्विकारलेल्या लोकसहभाग या उपक्रमाद्वारे मनपा प्रशासनात मार्गदर्शकाच्या भूमिकेतून सहभागी होवून आपल्या अनुभवाच्या शिदोरीवर मार्गदर्शन करावे, अशी आशा मा. जगताप यांनी व्यक्त केली. या कार्यक्रमामध्ये श्री. समेळ यांनी सेवानिवृत्त सेवकांना सदिच्छा देताना त्यांना मनपात आलेल्या अनुभवांचा आणि प्रदीर्घ कारकिर्दीबाबत आढवा घेतला. अध्यक्षीय मार्गदर्शनामध्ये मा. विजय दहिभाते यांनी सेवानिवृत्त सेवकांनी मिळालेल्या पैशाची योग्य प्रकारे गुंतवणूक करणेबाबतचे महत्व विषद केले. तसेच, सर्व सेवानिवृत्त सेवकांना त्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. सर्व सेवानिवृत्त सेवकांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते शॉल व स्मृतीचिन्ह देवून गौरविण्यात आले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन श्री. जयवंत शिंदे, ज्यु.ग्रे.लेखनिक यांनी केले.

## कुस्ती स्पर्धा गुलसे तालिम येथे संपन्न

दि.१६/१/०९ रोजी आयोजित करण्यात आलेल्या कुस्ती स्पर्धा गुलसे तालिम येथे संपन्न झाल्या. यामध्ये मनपातील १८ मल्लांनी भाग घेतला होता.स्पर्धा ५ गटांत घेतल्या. स्पर्धेच्या उद्घाटनासाठी मा. विजय जाधव, वस्ताद व मा. गोविंदशेट भटकड, विश्वस्त, गुलसे



तालिम उपस्थित होते. कुस्ती या खेळाचा प्रचार व प्रसार करण्याची जबाबदारी सर्व खेळाडू व क्रीडापटुंवर असून दैनंदिन कामातील ताणतणाव कमी करुन कार्यक्षमता वाढविणेसाठी खेळाची जोपासणा करणे आवश्यक असल्याचे मा. जगताप यांनी प्रास्ताविकात नमूद केले. प्रमुख पाहुणे मा.जाधव यांनी मार्गदर्शनामध्ये क्रिकेट खेळ सोडला तर इतर क्रीडा प्रकारांना दुय्यम स्थान मिळत आहे. या खेळाचा जास्तीत जास्त प्रचार व प्रसार मल्लांनी करावा असे नमूद केले. स्पर्धेमध्ये ६० किगट श्री.दिलीप कवितके, ७४ कि. गट श्री.राम बोडके, ८५ कि. गट श्री.अजय लांडे, ९६ कि .गट श्री.हनुमंत नांगरे व खुला गट श्री.शुक्राचार्य वांजळे यांनी प्रथम क्रमांक पटकावले. उपविजेतेपद अनुक्रमे सर्वश्री विजय जावळकर, कैलास शेडे, शांताराम करंजावणे, भगवान बोराटे व पप्पु जोरे यांना प्राप्त झाले. श्री. संदीप वांजळे यांनी पंच तर श्री. विकास लगड यांनी साईट पंच म्हणून काम पाहिले. सर्वश्री अप्पा गवारी, राम माझीरे, नामदेव भोसले, विलास मोहळ, बजरंग कारले व रघुनाथ शेंडगे यांनी स्पर्धेमध्ये सहभाग घेतला होता.

## महिलांचा क्रीडा स्पर्धांना उत्स्फूर्त प्रतिसाद

क्रीडा महोत्सवांतर्गत महिलांसाठी संगीत खुर्ची, दोरीउड्या, ५० मि.धावणे, थ्रो बॉल व स्लो स्कुटर स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांना मनपातील महिलांनी उत्स्फूर्त



प्रतिसाद दिला. सुमारे १०० पेक्षा जास्त महिला या स्पर्धांमध्ये सहभागी झाल्या होत्या. या स्पर्धांचा उद्घाटन समारंभ दि.१९/१/०९ रोजी पं.नेहरु स्टेडियम येथे संपन्न झाला. या समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून मा.मनिषा घाटे, सभासद, पुणे मनपा, मा. मुक्ता मनोहर, सरचिटणीस, पुणे मनपा कामगार युनियन व मा. माधव जगताप, क्षेत्रीय अधिकारी, विश्रामबागवाडा हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुरुवातीस मा. नंदकिशोर जगताप, सचिव, कामगार कल्याण निधी यांनी प्रमुख पाहुण्यांना पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. प्रास्ताविकामध्ये महिलांनी पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या संख्येने सहभाग नोंदविल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करुन सर्व महिला समन्वयकांनी घेतलेल्या विशेष परिश्रमाचे कौतुक केले. तसेच, दिवसेंदिवस महिलांचा सहभाग वाढत जाईल असा आशावाद व्यक्त केला. मा. मनिषा घाटे यांनी कामगार कल्याण निधीच्या या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक करुन महिला मा.सदस्यांसाठी अशा स्पर्धांचे आयोजन करावे, ही अपेक्षा व्यक्त केली. या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे मनपातील ज्या महिला सेविकांना शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त झाला आहे त्या सौ.संगिता सोनवणे, श्रीमती वृषाली गायकवाड, श्रीमती मिनाक्षी ठाकूर, सौ. सुषमा गुप्ते व सौ स्वाती परांजपे या पंच खेळरत्न मनपा महिला सेविकांचा पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला.

संगित खुर्ची या क्रीडा प्रकारामध्ये श्रीमती अस्मिता सलुजा यांनी प्रथम, श्रीमती नीलिमा गंगावणे यांनी द्वितीय व सौ. वैशाली कुंभार यांना तृतीय क्रमांक प्राप्त केला. दोरीउड्यामध्ये श्रीमती सुरेखा मुळीक, श्रीमती पूजा देशमुख व श्रीमती अस्मिता सलुजा यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला. थ्रो बॉल स्पर्धेमध्ये प्रथम श्रीमती सुरेखा थोरात, द्वितीय श्रीमती राधिका जगताप व तृतीय क्रमांक श्रीमती स्वाती कांबळे यांना प्राप्त झाला.

महिलांची ५० मिटर धावणे स्पर्धा दोन गटांमध्ये संपन्न झाली. वय वर्षे १८ ते ३५ या गटांमधून श्रीमती स्वाती कांबळे यांनी प्रथम व श्रीमती सुरेखा थोरात यांनी द्वितीय क्रमांक प्राप्त केला तर ३५ व त्यापेक्षा जास्त वयोगटामधून प्रथम व द्वितीय क्रमांक अनुक्रमे सौ. रसिका निघुट व सौ. संगिता खाडे यांना मिळाला. स्लो स्कुटर स्पर्धेमध्ये श्रीमती शुभांगी पारटे, श्रीमती माया शिंदे व श्रीमती कल्पना सस्ते यांना अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळाला. यापुढे स्पर्धांमध्ये महिलांनी मोठ्या प्रमाणावर सहभागी होवून क्रीडा क्षेत्रात कार्यरत व्हावे व मनपाचा लौकिक वाढवावा, असे आवाहन निधीमार्फत करण्यात येत आहे.

## उप आयुक्त क्र. ३ संघ क्रिकेटमध्ये विजेता

दि.१२ ते १६ जानेवारी, ०९ दरम्यान पं. नेहरु स्टेडियम येथे क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेसाठी ८ संघ निवडण्यात आले होते. या संघांदरम्यान १५ षटकांचे सामने साखळी पध्दतीने घेण्यात आले. यात मनपा भवन व उपायुक्त क्र. ३या संघादरम्यान दि.१९/१/०९ रोजी पं.नेहरु स्टेडियम येथे २० षटकांचा अंतिम सामना खेळविण्यात आला. सामन्यामध्ये मनपा भवन संघाने २० षटकांत सर्व बाद ११६ तर उपायुक्त क्र. ३ च्या संघाने १९ व्या षटकामध्ये ६ बाद ११७ धावा करुन सामना जिंकला.

## स.प.महाविद्यालयात जलतरण स्पर्धा संपन्न



दि.१७/१/०९ रोजी स.प.महाविद्यालय तलावात जलतरण स्पर्धा १५ सहभागी सेवकांसाठी आयोजित केली होती. स्पर्धेचे उद्घाटन गिनिज बुकामध्ये नाव नोंदलेल्या व अत्यंत लहान वयात जगातील ७ समुद्र खाड्या यशस्वीपणे पार करणाऱ्या कु. रुपाली रेपाळे व आंतरराष्ट्रीय जीवरक्षक क्षेत्रात उत्तुंग यश प्राप्त केलेले श्री.गजानन भोकरे या जलतरणपटूंच्या उपस्थितीत पार पडले. स्पर्धा वय वर्षे १८ ते ४० व ४० पेक्षा जास्त अशा दोन गटांत घेण्यात आल्या. पहिल्या गटात श्री.विशाल बोरकर व श्री. विनायक गबदुले यांना अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांक मिळाला. तर दुसऱ्या गटात श्री. विजय पिंजन व श्री. अतुल ढगळे यांना अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांक मिळाला. स्पर्धेचे उत्कृष्ट आयोजन मा. सुभाष बोधे यांनी केले. त्यांच्या या बहुमुल्य सहकार्याबद्दल निधीतर्फे त्यांचे विशेष आभार.

## कॅरम व बुध्दिबळ स्पर्धा पं. नेहरु स्टेडियम येथे संपन्न

कामगार कल्याण निधीमार्फत आयोजित क्रीडा महोत्सवांतर्गत कॅरम व बुध्दिबळ स्पर्धांचे आयोजन दि.१७/१/०९ रोजी पं.नेहरु स्टेडियम येथे करण्यात आले होते. या स्पर्धाच्या



उद्घाटनास महिला ग्रँडमास्टर मा.कृतिका नडीग, मा.सुभाष थोरवे, अध्यक्ष व मा.सलागरे, उपाध्यक्ष, पुणे जिल्हा कॅरम असोसिएशन उपस्थित होते. निधीचे सचिव मा. नंदकिशोर जगताप यांनी प्रमुख पाहुण्यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना मा.नडीग यांनी कोणत्याही खेळामध्ये प्राविण्य मिळविण्यासाठी चिकाटी, एकाग्रता व अथक परिश्रम आवश्यक आहे असे नमूद करुन मनपाच्या या उपक्रमाची स्तुती केली. तसेच, पुणे जिल्ह्यातून अनेक खेळाडू राष्ट्रीय स्तरावर प्राविण्य मिळवत असल्याचा उल्लेख मा.सुभाष थोरवे यांनी आपल्या मार्गदर्शनामध्ये केला. मनपाकडे अनेक गुणवंत क्रीडापटू असून, त्यांच्या गुणांना वाव देण्यासाठी निधीमार्फत राबविण्यात येणाऱ्या या स्तुत्य उपक्रमाचे त्यांनी कौतुक केले.

तदनंतर प्रमुख पाहुण्यांनी स्वत: खेळून या स्पर्धाचे उद्घाटन केले. बुध्दिबळ स्पर्धेमध्ये २८ मनपा अधिकारी/सेवकांनी भाग घेतला होता. यामध्ये श्री. सदानंद लिटके यांनी प्रथम, श्री. दत्तात्रय भंडारी यांनी द्वितीय तर श्री. शफिक सय्यद यांनी तृतीय क्रमांक पटकावला. कॅरम स्पर्धेमध्ये ४७ सभासदांनी भाग घेतला होता. दोन दिवस चाललेल्या या स्पर्धेमध्ये श्री. प्रकाश कॅथम यांनी प्रथम तर श्री. अरुण खंदारे यांनी द्वितीय क्रमांक मिळविला.

**कल्याणवार्ता**
**डिसेंबर, २००८**
❖ **प्रकाशक तथा अध्यक्ष** ❖
**कामगार कल्याण निधी**
**मा. प्रवीणसिंह परदेशी**
आयुक्त, पुणे महापालिका
❖ **संपादक** ❖
मा. नंदकिशोर जगताप
सल्लागार (कामगार)
❖ **कार्यकारी संपादक** ❖
शिवाजी दौंडकर
कामगार कल्याण अधिकारी
❖ **सहाय्यक** ❖
सौ. ज्योती अ.भोसले
❖ **मुद्रक** ❖
जयंत पवार
व्यवस्थापक,
मुद्रणमहर्षि मामाराव दाते
मुद्रणालय, मनपा, पुणे.
❖ **प्रकाशन स्थळ** ❖
पुणे महापालिका
शिवाजीनगर, पुणे ४११ ००५
या अंकात प्रसिध्द झालेल्या मतांशी प्रकाशक, संपादक, कार्यकारी संपादक व पुणे महापालिका सहमत असतीलच असे नाही.
❖ **संपर्क** ❖
सल्लागार (कामगार) कार्यालय, पुणे महानगरपालिका.
दूरध्वनी क्र. २५५० १२५५/ १२५२/१२५३
ईमेल आयडी
nandkumar.jagtap @punecorporation.org

## गरजेनुरुप प्रशिक्षण - निबंध

कामगार कल्याण निधीमार्फत गरजेनुरुप सेवक प्रशिक्षण - अपेक्षा व उपाय योजना या विषयावर निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. स्वहस्ताक्षरात ५०० शब्दांपर्यंत निबंध लिहून पाठविणेबाबत स्पर्धकांना सूचित करण्यात आले होते. अंतिम दिनांकापर्यंत एकूण ८ अधिकारी/सेवकांकडून निबंध प्राप्त झाले. या निबंधांचे परीक्षण करणेसाठी परीक्षक म्हणून माजी कार्यकारी संपादक, कल्याणवार्ता व सदस्य कार्यकारी समिती, कामगार कल्याण निधी श्री. लीलाधर प्रभाकर वाबळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांचेकडील प्राप्त निकालानुसार श्रीमती सुजाता यंदे यांना प्रथम तर श्री. जगताप महेंद्र यांना द्वितीय क्रमांक प्राप्त झाला. यशस्वी स्पर्धक सभासदांचे हार्दिक अभिनंदन.

## टेबल टेनिस स्पर्धा पाच गटांत संपन्न

क्रीडा महोत्सवांतर्गत १७/१/२००९ रोजी सणस स्पोर्टस् क्लब येथे टेबल टेनिस स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी राष्ट्रीय खेळाडू मा. उपेंद्र मुळे व प्रशिक्षक मा. सुबोध देशपांडे उपस्थित होते. सुरुवातीस मा. नंदकिशोर जगताप, सचिव, कामगार कल्याण निधी यांनी पुष्पगुच्छ देवून पाहुण्याचे स्वागत केले. टेबल टेनिस खेळाडू श्री. नंदकुमार जगताप यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करुन दिली. या प्रसंगी इच्छुक महापालिका अधिकारी/सेवकांना टेबल टेनिसचे प्रशिक्षण मोफत देण्याची घोषणा प्रमुख पाहुण्यांनी या प्रसंगी केली. या स्पर्धेमध्ये एकूण १५ अधिकारी/सेवकांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धा पाच गटांमधून खेळविण्यात आल्या. पुरुष एकेरी स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक श्री. नंदकुमार जगताप, विभागीय आरोग्य निरीक्षक तर द्वितीय क्रमांक श्री. रविंद्र भाडळे, सि.ग्रे.लेखनिक यांनी प्राप्त केला.

महिला एकेरी स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक मा. मंजुषा इधाटे, म्युनिसिपल प्रॉसिक्युटर यांनी तर द्वितीय क्रमांक



सुप्रिया परदेशी, ज्यु.ग्रे.लेखनिक यांनी मिळविला. पुरुष दुहेरी स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक सर्वश्री रविंद्र भाडळे व नंदकुमार जगताप तर द्वितीय क्रमांक सर्वश्री राजपाठक श्रीरंग, सरलेखनिक व मकवाना, शिपाई यांना मिळाला. महिला दुहेरी स्पर्धेत प्रथम क्रमांक ॲड. मंजुषा इधाटे व पूनम दिघे तर द्वितीय क्रमांक श्रीमती सुप्रिया परदेशी व वृशाली गायकवाड, ज्यु.ग्रे.लेखनिक यांनी मिळवला. शेवटी पुरुष महिला मिश्र दुहेरी स्पर्धा खेळविण्यात आली. यामध्ये ॲड. मंजुषा इधाटे व रविंद्र भाडळे यांना प्रथम क्रमांक मिळाला तर द्वितीय क्रमांक श्रीरंग राजपाठक व सुप्रिया परदेशी यांना मिळाला.

## सणस स्पोर्टस् मैदानावर धावणे व लांब उडी स्पर्धा संपन्न

कामगार कल्याण निधीमार्फत आयोजित विविध क्रीडा स्पर्धांमध्ये



दि.१७/१/०९ रोजी सणस मैदानावर १०० मि.धावण्याची स्पर्धा संपन्न झाली. या स्पर्धेसाठी वय वर्षे १८ ते ३० व ३० ते ४५ या दोन गट करण्यात आले होते. यामध्ये २५ सेवकांनी सहभाग नोंदविला. वय वर्षे १८ ते ३० या गटामध्ये सर्वश्री सचिन शेलार, विशाल बोडकर व अविनाश वाघमारे यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला. वय वर्षे ३० ते ४५ या वयोगटात प्रथम श्री.अनंत टोले, द्वितीय श्री. प्रसाद वाळुंजकर व तृतीय क्रमांक श्री. गणेश मांजरे यांनी पटकावला.

धावण्याच्या स्पर्धेनंतर लांब उडी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. ही स्पर्धा दोन गटांमध्ये घेण्यात आली. वय वर्षे १८ ते ३० या गटामध्ये प्रथम क्रमांक श्री. प्रशांत गायकवाड, द्वितीय क्रमांक श्री. देवदत्त देवकर व तृतीय क्रमांक श्री. अविनाश वाघमारे यांनी पटकावला. वय वर्षे ३० ते ४५ या वयोगटात प्रथम क्रमांक श्री. अनंत टोले, द्वितीय क्रमांक श्री. बाळकृष्ण खेराडे व तृतीय क्रमांक श्री. लक्ष्मीकांत शिंदे यांनी पटकावला.

## बॅडमिंटन स्पर्धेचा पहिल्यांदा समावेश

क्रीडा महोत्सवांतर्गत बॅडमिंटन स्पर्धा दि.१७/१/०९ रोजी सणस स्पोर्टस् क्लब येथील हॉलमध्ये संपन्न झाल्या. या स्पर्धेमध्ये १८ मनपा अधिकारी/सेवकांनी भाग घेतला होता. स्पर्धेच्या उद्घाटनास मा.अशोक येनपुरे, सभासद, पुणे मनपा प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. सुरुवातीस मा.श्रीकृष्ण चौधरी, उपायुक्त (तांत्रिक) यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करुन दिल्यानंतर निधीचे सचिव मा. नंदकिशोर जगताप, यांनी उपस्थितांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. मनपा अधिकारी/सेवकांसाठी एकाच ठिकाणी स्पोर्टस् कॉम्प्लेक्स असावे, त्यामध्ये सर्व क्रीडा प्रकारांसाठी पुरेशी जागा व साहित्य उपलब्ध असावे, यासाठी विशेष प्रयत्नांची आवश्यकता



मा.येनपुरे यांनी मार्गदर्शनात व्यक्त केली. अत्यंत दुर्मिळ क्रीडा प्रकाराच्या समावेशाबद्दल निधीचे कौतुक केले. स्पर्धेमध्ये मा.डॉ.चव्हाण आर.जे. व मा. श्रीकृष्ण चौधरी यांना अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांक मिळाला.